# श्री. सिद्धेश्वर महाविद्यालय, माजलगाव जि. बीड

## मराठी विभाग, आयोजित

## ग्रामीण साहित्य आणि वास्तव

## एकदिवसीय राष्ट्रीय वेबीनार : अहवाल

**दिनांक** : 13.07.2020 **वेळ** : 11.00 ते 02.00

श्री. सिद्धेश्वर महाविद्यालय, माजलगाव, मराठी विभाग आयोजित 'ग्रामीण साहित्य आणि वास्तव' एकदिवसीय राष्ट्रीय वेबिनार सोमवार दि. 13/07/2020 रोजी संपन्न झाला. या मराठी विषयाच्या राष्ट्रीय वेबिनारमध्ये एकुण 62 प्राध्यापक बंधु-भगीनी सहभागी झाले असून हा वेबीनार एकुण चार सत्रात संपन्न झाला.

1) **सत्र पहिले** :- उद्घाटन सत्र सकाळी 11.00 ते 12.00 या कालावधीत संपन्न झाले या सत्राची सुरुवात उद्घाटनाने झाली. उद्घाटक, श्री. सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह, मा. श्री. अमरनाथ खुर्पे यांनी सर्वप्रथम या वेबीनारचे उद्घाटन झाल्याची घोषणा करुन उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी मराठी साहित्यातील सारस्वतांचा धांडोळा घेवून मराठी साहित्यात ग्रामीण साहित्य हे अधिक वास्तवपणे मानवी जीवन मांडणारे आहे. त्याचे अधिकाधिक लेखन होण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करुन वेबीनारला शुभेच्छा दिल्या.

या पहिल्या सत्राचे अध्यक्ष, तथा महाविद्यालय, विकास समीतीचे अध्यक्ष मा. श्री. अभय कोकड यांनी आपला अध्यक्षीय समारोप करताना अशा प्रकारच्या ग्रामीण साहित्यावर महाविद्यालयातील मराठी विभागाने वेबीनार घेतला आणि ग्रामीण जीवनावर प्रकाश टाकला त्याबद्दल अभिनंदन केले आणि या वेबीनारमधुन नव्याने अधिकाधिक साहित्यीक निर्मान व्हावेत शेंद्रिय शेतीचे महत्व लेखनातून अधोरेखीत करावे असे सांगून शुभेच्छा दिल्या.

तर बीजभाषक म्हणून उपस्थित असलेले प्रा. डॉ. कैलास अंबुरे मराठी विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी आपल्या बीजभाषणातून मराठी साहित्यांचे विविध आयाम यावर प्रकाश टाकून ग्रामीण 'मराठी साहित्य आणि वास्तव' यावर प्रकाश टाकला. 'ग्रामीण साहित्य' हे आज क्षीण होत चाललेले आहे या साहित्याची चळवळ कोणी थांबवली व त्याला कोणकोणती कारणे जबाबदार आहेत याचाही खरबसून समाचार घेतला आणि नव्या पीढीतील लेखकांनी आता नव्या ग्रामीण संस्कृतीच्या अंगाने लेखन करावे व ही चळवळ पुना गतीमान करावी आसे आवाहन केले.

**सत्र दुसरे** : 'ग्रामीण साहित्य प्रवाह' या विषयावर 12.00 ते 12.30 या कालावधीत संपन्न झाले. या सत्राचे मार्गदर्शक प्रा. डॉ. महेश खरात, विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर, यांनी ग्रामीण साहित्य प्रवाहाचा उदय, विकास आजचे स्वरुप यावर सखोल मार्गदर्शन करुन हा प्रवाह ग्रामीण संस्कृती, परंपरा, शेती-माती यांची व्यथा आणि कथा सांगणारा आहे. त्यामुळे सर्व साहित्य प्रवाहाचं मुळ म्हणून याकडे पाहावे लागेल हा प्रवाह समृद्ध व्हायला हवा असे मत व्यक्त केले.

**सत्र तिसरे** : 'ग्रामीण साहित्य आणि कृषीसंस्कृती' या विषयावर 12.30 - 1.00 या कालावधीत संपन्न झाले. या सत्राचे प्रमुख मार्गदर्शक, प्रा. डॉ. सर्जेराव जीगे पाटील, प्रतीष्ठान महाविद्यालय, पैठण यांनी ग्रामीण साहित्यातील कृषी संस्कृतीवर प्रकाश टाकून ग्रामीण संस्कृती, रिती, रिवाज, परंपरा या कृषी, शेती संस्कृतीवर आधारीत आहे. या साहित्याची पाळंमुळं, शेतकरी संघटना आणि नव्यापीढीतला ग्रामीण शेती संस्कृतीतला तरुण शिक्षण घेवून आपलं

शेतीनिष्ठ जगणं साहित्याचा विषय करु लागला.या उर्मीतून ग्रामीण साहित्य उदयास आलं आणि पाहता - पाहता ना. धो महानोर, रा.र. बोराडे, जगदीश कदम, नागनाथ कोतापल्ले, रविंद्र ठाकूर, भास्कर चंदनशीव, इंद्रजीत भालेराव, वासुदेव मूलाटे इ. लेखकांची मोठी फळी निर्माण झाली असे मत व्यक्त केले.

**सत्र चौथे** : दु. 1.00 - 2.00 या कालावधीत संपन्न झाले, या सत्राचे मार्गदर्शक प्रा. संजय शिंदे, जनसंपर्क अधिकारी, डॉ.बा.आं.म.वि. औरंगाबाद, या प्रसंगी म्हणाले की, ग्रामीण मराठी साहित्य आणि वास्तव हा विषय ग्रामीण मराठी संस्कृतीवर प्रकाश टाकणारा असून ग्रामीण जीवनातील प्रश्न, समस्या मांडणारा आहे असे मत व्यक्त केले.

या सत्राचा अध्यक्षीय समारोप श्री. सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष मा. श्री. प्रकाश दुगड यांनी केला. या प्रसंगी ते म्हणाले की, मराठी साहित्यात नरहर कुरुंदकर वि.स. खांडेकर, नागनाथ कोतापल्ले, वा. ल. कुलकर्णी यांनी मोठी भर घातली आहे. यातून ग्रामीण शेतकऱ्यांचे दु:ख मांडलेले आहे. आज या साहित्यात नव्याने भर पडण्याची आवश्यक्ता आहे. अशा शब्दात आपले मत व्यक्त केले.

या वेबीनारचे प्रस्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भालचंद्र कराड यांनी केले. या वेळी त्यांनी मराठी साहित्याला एक मोठी समृद्ध अशी परंपरा आहे. केशवसुत, बहिणबाई चौधरी, नरहर कुरुंदकर, वासुदेव मुलाटे, इ. मान्यवरांचा नामोल्लेख करुन ग्रामीण साहित्य हे ग्राम संस्कृतीतील जिवन उजेडात आननारे कसे आहे यावर प्रकाश टाकला आणि वेबीनार घेणाऱ्या मराठी विभागास शुभेच्छा दिल्या.

या वेबीनारचे सुत्रसंचालन प्रा. डॉ. ज्ञानेश्वर गवते यांनी केले तर आभार प्रा. डॉ. देवीदास खोडेवाड यांनी मानले. यावेळी उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, उपप्राचार्य प्रा. युवराज मुळये, प्रा. डॉ. विनायक देशमुख, प्रा. सुनिल पाटील, प्रा. कमलकिशोर लड्डा, डॉ. सचिन दाभाडे आदींचे सहकार्य लाभले.

**संयोजक, प्रा. डॉ. ज्ञानेश्वर गवते**

**सहसंयोजक, प्रा. डॉ. देवीदास खोडेवाड**

**आयोजक**

**प्राचार्य डॉ. भालचंद्र कराड**

**श्री. सिद्धेश्वर महाविद्यालय, माजलगाव**


REDMI NOTE 6 PRO
MI DUAL CAMERA


REDMI NOTE 6 PRO
MI DUAL CAMERA


ग्रामीण साहित्य आणि वास्तव मराठी वेबिणार
People (55)
Chat
Kamlakar Chavan 1:06 AM
आयोजक महाविद्यालयाचे मनःपूर्वक अभिनंदन..
Umesh mundhe 1:09 AM
डॉ. जिगे सर यांनी सूत्रबद्ध आणि वेळेमध्ये छान मांडणी केली आहे
Satyashila Deshmukh 1:09 AM
सर्वच वक्त्यांनी आभ्यासपूर्ण मांडणी केली.
Laxman Gadge 1:09 AM
आयोजक महाविद्यालयाचे मनःपूर्वक अभिनंदन..
Ashok Khetri 1:10 AM
Dr jige sir Dhanywad
Pramod Jadhav, Latur 1:12 AM
REDMI NOTE 6 PRO
MI DUAL CAMERA


ग्रामीण साहित्य आणि वास्तव मराठी वेबिणार
People (56)
Chat
Kamlakar Chavan 1:06 AM
आयोजक महाविद्यालयाचे मनःपूर्वक अभिनंदन..
Umesh mundhe 1:09 AM
डॉ. जिगे सर यांनी सूत्रबद्ध आणि वेळेमध्ये छान मांडणी केली आहे
Satyashila Deshmukh 1:09 AM
सर्वच वक्त्यांनी आभ्यासपूर्ण मांडणी केली.
Laxman Gadge 1:09 AM
आयोजक महाविद्यालयाचे मनःपूर्वक अभिनंदन..
Ashok Khetri 1:10 AM
Dr jige sir Dhanywad
Pramod Jadhav, Latur 1:12 AM
REDMI NOTE 6 PRO
MI DUAL CAMERA